# <u>प्रेसनोट दिनांक २२/०७/२०२४</u>

**गणपत धनाजी आदलिंग,वय - ५७ वर्षे, ग्रामविकास अधिकारी, वर्ग - ३ ग्रामपंचायत कबनुर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, रा. कृष्णतारा अपार्टमेंन्ट, प्लॅट नंबर २, मराठा कॉलनी, कसबा बावडा, कोल्हापूर मुळ रा. निमगांव केतकी, ता.इंदापुर, जि.पुणे यांनी ९,०००/- रूपयांची लाच मागणी करून ९,०००/- रूपये लाच स्विकारलेबाबत......**

---

तक्रारदार हे कॉन्ट्रक्टर असुन त्यांनी मौजे कबनुर ग्रामपंचायत,ता.हातकणंगले, येथील वॉर्ड क्र-२ मधील वाढीव पाईप लाईन बसविणेच्या कामाची २,४३,९०४/- रूपायाची निविदा दि.१/७/२०२४ रोजी निघाली होती ती मी नियमाप्रमाणे भरलेली होती सदर भरलेली निविदेतील कामाबाबत विचारणा करणेसाठी तक्रारदार हे आलोसे आदलिंग ग्रामविकास अधिकारी यांना भेटले असता आलोसे यांनी तक्रारदार यांना कामाची वर्क ऑर्डर देणेकरीता तक्रारदार यांच्याकडे ९०००/- रुपय लाचेची मागणी केली होती.

तक्रारदार यांनी दिले तक्रारीप्रमाणे दिनांक २२/७/२०२४ रोजी पडताळणी केली असता पडताळणीमध्ये मौजे कबनुर ग्रामपंचायत येथील ग्रामविकास अधिकारी गणपत धनाजी आदलिंग यांनी तक्रारदार यांच्याकडे मौजे कबनुर ग्रामपंचायत, ता हातकणंगले, येथील वॉर्ड क्र-२ मधील वाढीव पाईप लाईन बसविणेच्या कामाची वर्क ऑर्डर देणेसाठी ९०००/- रुपय लाचेची मागणी केलेचे निषन्न झाले.

त्यानंतर लागलीच सापळा कारवाई आयोजीत केली असता जिल्हा परिषद कार्यालय, कोल्हापूर येथे पंच साक्षीदार यांच्या समक्ष तक्रारदार यांचेकडुन आलोसे गणपत आदलिंग,ग्रामविकास अधिकारी यांनी ९०००/- रूपये लाच रक्कम स्विकाल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे सदरबाबत गणपत धनाजी आदलिंग, ग्रामविकास अधिकारी, मौजे कबनुर ग्रामपंचायत, ता. हातकणंगले यांचेविरूध्द शाहुपुरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री बापु साळुंके पोलीस निरीक्षक, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर, पो.हे.कॉ. श्री विकास माने, पो.हे.कॉ. श्री सुनिल घोसाळकर, पो.ना.सचिन पाटील, पोकॉ संदिप पवार, चा.पो.हे.कॉ. गजानन कुराडे ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३) श्री.बापू साळुंके, पोलीस निरीक्षक, अतिरिक्त कार्यभार, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**

**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**